| | **पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१,**<br>**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय**<br>**पत्ता- प्रिमियर कंपनीच्या शेजारी,**<br>**जुना पुणे-मुंबई रस्ता, चिंचवड, पुणे १९** | |
|---|---|---|

**प्रेस नोट**

**दिनांक - ३०/०६/२०२२**

**लग्नाचे अमिष दाखवुन शरीरसंबंध ठेवणा-याविरुध्द गुन्हा दाखल**
**फरार आरोपीस लातुर येथुन घेतले ताब्यात : महाळुंगे पोलीसांची कामगिरी**

---

पिडीत महिले सोबत कंपनीमध्ये काम करणारा भगवान राम बिरादार याने पिडीत महिलेस लग्नाचे अमिष दाखवुन तिचे सोबत माहे-जुलै/२०२० पासुन शरीरसंबंध ठेवले व तिचे सोबत लग्न न करता दुसरे स्त्री सोबत लग्न ठरविले. सदर बाबत पिडीत महिला जाब विचारण्यास गेली असता तिला मारहाण करुन शिवीगाळ, दमदाटी केल्याने पिडीत स्त्रीने दिलेल्या तक्रारी वरुन चाकण पोलीस स्टेशन अंकित महाळुंगे पोलीस चौकी येथे **गुन्हा रजि.नंबर १०३८/२०२२ भा.द.वि.कलम ३७६ (१)(२)(एन), ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.**

महाळुंगे पोलीस चौकीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक **श्री.अरविंद पवार** यांनी लागलीच आरोपीचे शोधा करीता दोन पथक तयार केले व आरोपीचे पुणे येथील त्याचे राहते घरी व मुळगावी शोध घेण्याचे सुचना दिल्या. आरोपी भगवान राम बिरादार याचे शोधा करीता पोलीस पथक रुपीनगर पुणे येथे गेले असता पोलीस शोधत असल्याचे समजल्याने तो रुपीनगर पुणे येथुन फरार झाला. तांत्रिक तपासाचे आधारे शोध घेत त्यास लातुर येथील जवळगा साकोळ येथुन ताब्यात घेवुन दि २९/०६/२०२२ रोजी २३:३५ अटक केली आहे.

**अटक आरोपीचे नाव –**
**भगवान राम बिरादार**, वय २७ वर्षे, राहणार- जवळगा साकोळ, ता देवणी, जि लातुर

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त **श्री.अंकुश शिंदे**, मा.अपर पोलीस आयुक्त **श्री.संजय शिंदे**, मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१ **श्री मंचक इप्पर**, सहाय्यक पोलीस आयुक्त, चाकण विभाग **श्रीमती प्रेरणा कट्टे**, वरीष्ठ पोलीस निरीक्षक **श्री.अरविंद पवार**, पोलीस निरीक्षक (गुन्हे) **दशरथ वाघमोडे**, यांचे सुचना व मार्गदर्शनानुसार सहा.पोलीस निरीक्षक **दत्तात्रय गुळीग**, पोलीस उपनिरीक्षक **किरण शिंदे**, पोलीस अंमलदार- **राजु राठोड, बाळकृष्ण पाटोळे** यांनी केली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक **किरण शिंदे** हे करीत आहेत.

( मंचक इप्पर )
पोलीस उप आयुक्त,परिमंडळ १
पिंपरी चिंचवड शहर